Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | सोमवार
२२.०६.२०२६

# वरुड दर्पण

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १४२ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### अखेर राजकीय भूकंप झालाच, इंग्लंडच्या पंतप्रधानांचा थेट राजीनामा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - ब्रिटिश पंतप्रधान कीर स्टारमर यांनी पंतप्रधान आणि लेबर पार्टीच्या नेतेपदाचा राजीनामा दिला आहे. १० डाउनिंग स्ट्रीटबाहेर राष्ट्राला संबोधित करताना ते म्हणाले, 'पुढील निवडणुकीत पक्षाचे नेतृत्व करण्यासाठी मी योग्य व्यक्ती आहे असे लेबर पार्टीला वाटत नाही.' स्टारमर यांचा राजीनामा त्यांच्या नेतृत्वावरून लेबर पार्टीमध्ये वाढत्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर आला आहे. गेल्या काही महिन्यांत, अनेक खासदार आणि मंत्र्यांनी त्यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. बीबीसीच्या वृत्तानुसार, अँडी बर्नहॅम हे त्यांचे उत्तराधिकारी होण्याच्या शर्यतीत आघाडीवर आहेत.

## मिंधे बाळंत झालेत, त्यांनी सहा गद्दारांना जन्म दिलाय : राऊतांनी टीका करताना टोक गाठलं

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - ठाकरेंच्या सहा खासदारांनी त्यांची साथ सोडून शिंदेंच्या गटात सामील होण्याचा निर्णय घेतल्यानंतर संजय राऊतांनी सातत्याने त्यांच्यावर टीका करताना दिसत आहेत. आताही त्यांनी अशाच प्रकारची जहरी टीका केल्याचं दिसतंय. मिंधे बाळंत झाले असून त्यांनी सहा गद्दारांना जन्म दिलाय, अशा शब्दात संजय राऊतांनी समाचार घेतला. पुढे जाऊन त्यांचे सिजरिंग करावं लागेल, अशा शब्दातही राऊतांनी तोंडसूख घेतलं.

ठाकरेंच्या शिवसेनेच्या सहा खासदारांनी त्यांना जय महाराष्ट्र करत शिंदे गटाची वाट धरली आहे. त्यामध्ये संजय जाधव, संजय देशमुख, भाऊसाहेब वाकचौरे, संजय दिना पाटील, नागेश पाटील आष्टीकर आणि ओमराजे निंबाळकरांचा त्यामध्ये समावेश आहे. ही गोष्ट ठाकरेंच्या शिवसेनेला चांगलीच जिव्हारी लागल्याचं दिसतंय.



संजय राऊतांची टीका शिंदेंसोबत गेलेले सहा खासदार मुंबईत परतले असून त्यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आहे. त्यावर खासदार संजय राऊत यांनी जोरदार टीका केली. संजय राऊत म्हणाले की, मिंधे बाळंत झाले आहेत, त्यांनी सहा गद्दारांना जन्म दिलाय. ऑपरेशन सक्सेस झालं आहे. त्यांची बॉडी सुस्थितीत आहे असं नाही, पुढे त्यांना सिजरिंग करावं लागेल. पुढे बोलताना राऊत म्हणाले की, हा एक विक्रम आहे. केनियामध्ये एका महिलेला पाच मुलं झाली होती. इथे सहा गद्दार जन्माला आले आहेत. संजय राऊतांच्या या टीकेवर आता शिंदेंच्या शिवसेनेतून काय प्रत्युत्तर दिलं जाणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

बंडखोर खासदार भूमिका मांडणार दरम्यान, सहा बंडखोर खासदार मुंबईत परतले असून त्यांनी एकनाथ शिंदे यांची नंदनवन या निवासस्थानी भेट घेतली. हे सर्व खासदार आणि एकनाथ शिंदे आता त्यांची भूमिका मांडणार आहेत.

बंड केलेल्या या सहा खासदारांनी एक स्वतंत्र गट निर्माण केला असून तसे पत्र त्यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना दिलं आहे. त्या संबंधीत फोटो आणि लोकसभा अध्यक्षांना दिलेलं पत्र आता समोर येण्याची शक्यता आहे. हे सहाही खासदार एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत लवकरच प्रवेश करणार असल्याची माहिती आहे.

## ९७ हजार ७०६ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर

### * देवेंद्र फडणवीस सरकारचा नवा विक्रम : शेतकऱ्यांच्या कर्ज माफीसाठी २० हजार ७५२ कोटींची तरतूद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सोमवारी (दि. २२) मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तब्बल ९७ हजार ७०६.४० कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या दोन्ही सभागृहांत सादर करून नवा विक्रम नोंदवला.

विशेष म्हणजे चालू आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अवघ्या तीन महिन्यांतच, इतक्या खर्चाच्या मागण्या सादर झाल्याने विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर टीका सुरू केली आहे. या पुरवणी मागण्यांचे वैशिष्ट्य म्हणजे, सरकारने नुकतीच घोषणा केलेल्या शेतकरी कर्जमाफीसाठी तब्बल ४० हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये आधीच्या कर्जमाफीतील प्रलंबित बोजासाठी २०० कोटी, तर आताच जाहीर करण्यात आलेल्या नव्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' साठी २० हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

एकूण ९७ हजार ७०६ कोटी रुपयांच्या या स्थूल पुरवणी मागण्या असल्या, तरी विविध तांत्रिक समायोजने आणि केंद्र सरकारच्या मदतीचा परतावा लक्षात घेता, राज्याच्या तिजोरीवर प्रत्यक्ष निव्वळ अतिरिक्त भार ७४ हजार ८१७.६६ कोटी रुपयांचा पडणार आहे. सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागासाठी सर्वाधिक २२ हजार ०१५.४२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, त्यातील बहुतांश हिस्सा हा शेतकरी कर्जमुक्ती आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना भागभांडवल (७७७ कोटी रुपये) देण्यासाठी वापरला जाणार आहे. कर्जमाफीसोबतच सरकारने शहरी आणि ग्रामीण पायाभूत सुविधांसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद केली आहे. नगरविकास विभागासाठी तिसऱ्या क्रमांकाची म्हणजेच तब्बल १५ हजार १५२.४३ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

## लातूरच्या 'क्लास बाजारा'ला फटका

### सोशल मीडियातील अफवा पडल्या भारी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**लातूर** - नीट पेपर लीक प्रकरणात सीबीआयने स्थानिक पातळीवरील तीन बड्या व्यक्तींना अटक केल्यानंतर लातूरमधील कोचिंग क्लासचे जाळे चौकशीच्या फेऱ्यात आले आहे.

मात्र, यंदा लातूरमध्ये क्लास प्रवेशांमध्ये झालेली मोठी घट ही सोशल मीडियावरून पसरवल्या जाणाऱ्या अफवांमुळेच अधिक झाली असल्याचे येथील व्यावसायिकांचे म्हणणे आहे.

लातूर शहरात ३०० हून अधिक वसतिगृहे आणि




त्यांच्यावर अवलंबून असलेले अनेक व्यवसाय आहेत. शहरात १२ वीच्या परीक्षेसाठी ७० ते ८० हजार विद्यार्थी बाहेरून आलेले आहेत.

'नीट' पेपर लीक प्रकरणाच्या संदर्भात सीबीआयने शहरातील 'आरसीसी'चे संस्थापक शिवराज रघुनाथ मोटेगावकर, सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी आणि डॉ.मनोज शिरुरे यांना अटक केली होती.

भागधारकांच्या मते, सर्वात मोठी चिंता जिल्हा उद्योग केंद्राच्या एका नवीन आदेशामुळे निर्माण झाली आहे. लातूर इंडस्ट्रियल इस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये उत्पादनासाठी दिलेल्या औद्योगिक शेडमध्ये बेकायदेशीरपणे चालणाऱ्या सर्व व्यावसायिक कामे तातडीने बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### जिद्द, मेहनत आणि आईच्या पाठिंब्यावर

## पुसलाची डॉ.श्रेया बनली गावातच वैद्यकीय अधिकारी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** - जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे डॉ.श्रेया काळे. पुसल्यासारख्या छोट्याशा गावातील साध्या कुटूंबात जन्मलेल्या श्रेया यांनी लहान वयातच वडिलांचे छत्र हरवले. या कठीण परिस्थितीतही त्यांच्या आईने खंबीरपणे साथ देत मुलीच्या शिक्षणासाठी अथक परिश्रम घेतले.



आर्थिक आणि सामाजिक अडचणींचा सामना करत श्रेया यांनी शिक्षणाची वाट सोडली नाही. आईच्या प्रेरणेने आणि स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर त्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. अखेर श्रेया हिला गावातीलच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणुन रुजु झाली आणि तिने तिच्या स्वप्नांची पुर्तता केली.

> अनेक अडचणींवर मात करत जिद्द, मेहनत आणि आईच्या पाठिंब्याच्या जोरावर पुसल्यासारख्या छोट्याशा गावातील डॉ.श्रेया हिने वैद्यकीय अधिकारी बनण्याचा मान मिळविला आहे. लहानपणीच वडिलांचे छत्र हरपल्याने कुटूंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. मात्र आईने खंबीरपणे संसाराची जबाबदारी सांभाळत मुलीच्या शिक्षणात कोणतीही तडजोड होऊ दिली नाही.
> आर्थिक आणि सामाजिक अडचणींना सामोरे जात श्रेया यांनी शिक्षणाची वाटचाल सुरु ठेवली. कठोर परिश्रम, चिकाटी आणि आईच्या प्रेरणेच्या बळावर त्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. अखेर वैद्यकीय अधिकारी म्हणुन निवड होऊन त्यांनी आपल्या कुटुंबासह गावाचे नाव उज्वल केले आहे.

डॉ.श्रेया हिने यश संपादन करुन गावाचे नाव उज्वल केले आहे.

डॉ.श्रेया काळे हिच्या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

तिच्या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळत असून प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन मोठे स्वप्न पुर्ण करता येते, हा संदेश त्यांनी आपल्या कर्तृत्वातून दिला आहे.

डॉ.श्रेया काळे हिने तिच्या यशाचे श्रेय आईच्या त्यागाला, कुटूंबाच्या पाठींब्याला आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाला दिले. त्यांच्या या यशस्वी प्रवासाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

### दारुच्या पैशांच्या जुन्या वादावरुन

## तरुणाला बेदम मारहाण : तिघांविरुध्द गुन्हा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** - सावंगी येथे दारुच्या पैशांच्या जुन्या वादावरुन तिघांनी मिळून एका तरुणाला लाकडी काठीने आणि थापडा-बुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या मारहाणीत तरुण गंभीर जखमी झाला असून पोलिसांनी तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी नितेश लक्ष्मणराव



नांदणे हे १९ जूनरोजी रात्री ८.३० ते ९ च्या दरम्यान गावातून जात होते. आरोपी मंगेष वाघाडे याला दारु पिण्याची सवय असून तो फिर्यादीकडे दारुसाठी पैसे मागायचा. नितेश हे मंगेषच्या घरासमोरुन जात असताना त्याचे वडील अशोक वाघाडे यांनी माझ्या मुलासोबत काल का भांडण केले? असे म्हणुन नितेश यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

त्यानंतर अशोक वाघाडे यांनी त्यांच्या हातातील लाकडी काठीने नितेश यांच्या दोन्ही हातांवर मारहाण केली. तसेच उजव्या कानाच्या बाजूला काठी मारल्याने नितेश यांच्या कानातून रक्त निघून ते गंभीर जखमी झाले. याच वेळी तिथे हजर असलेले मंगेष वाघाडे आणि सागर वाघाडे यांनीही नितेश यांना थापडा-बुक्क्यांनी मारहाण करत शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली.

या घटनेप्रकरणी जखमी नितेश यांच्या जबानी रिपोर्टवरुन आणि वैद्यकीय प्रमाणपत्रावरुन वरुड पोलिसांनी आरोपी अशोक विठोबाजी वाघाडे, मंगेश अशोक वाघाडे आणि सागर अशोक वाघाडे यांच्याविरुद्ध कलम ११८(१), ३५२, ३५१(२), ३५१(३) बी.एन.एस. २०२३ अन्वये गुन्हा दाखल केला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.



# राजकारण कराल तर राजकीय उत्तर मिळेल : मुख्यमंत्री फडणवीस यांचा विरोधकांना इशारा, विधिमंडळ अधिवेशन आजपासून

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – अधिवेशनात आमचा प्रयत्न हा संवादाचा आहे. विरोधकांनी संवाद ठेवला तर आम्ही चर्चेतून सगळ्या प्रश्नांची उत्तरे द्यायला तयार आहोत. त्यामुळे राजकारण केले तर राजकीय उत्तर मिळेल. समाजकारण केले तर सामाजिक उत्तर मिळेल, असा निर्वाणीचा इशारा



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी विरोधी पक्षाला दिला. सरकारसाठी शेतकरी कर्जमाफी हा राजकीय विषय नाही, असेही फडणवीस यांनी विरोधकांना बजावले.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात होत आहे. या पार्श्वभूमीवर अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना फडणवीस यांनी सरकारच्या चहापानाच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकण्याच्या विरोधी पक्षाच्या निर्णयाची खिल्ली उडवली.संपूर्ण पत्रकार परिषदेमध्ये विरोधक कोणताही नवा विषय हा विरोधक मांडू शकलेले नाही. ज्या प्रश्नांवर चर्चा होऊन सरकारच्या वतीने कार्यवाही झालेली आहे तेच मुद्दे पत्रात उपस्थित करण्यात आले आहेत. लोकांना अपेक्षित असलेले मुद्दे विरोधकांना अद्याप अवगत झालेले नाहीत, अशी टीका फडणवीस यांनी केली. आजच्या घडीला समोर कुठल्याही निवडणुका नसताना आम्ही कर्जमाफी केली आहे. केवळ विधानसभाच नाही तर आम्ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुद्धा जिंकलो आहोत. त्यामुळे २०२८ किंवा २०२९ मध्ये कर्जमाफी करू असा विचार आम्ही केला नाही. आमच्यासाठी कर्जमाफी हे एक साधन आहे. यातून शेतकरी जगला पाहिजे. त्याला पुन्हा कर्ज देण्याची शक्ती प्राप्त झाली पाहिजे, असे फडणवीस म्हणाले.

एल निनोमुळे राज्यात खूप अडचणीची परिस्थिती तयार झाले आहे. आपण जून महिन्याच्या पावसाचा विचार केला, तर आतापर्यंत सरासरीपेक्षा ८० टक्के कमी पाऊस पडलेला आहे. लांबलेला पाऊस ही अत्यंत चिंतेची बाब आहे.

---

श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयात

# जागतीक योगदिन उत्साहात साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शिक्षण प्रसारक मंडळ लोणी द्वारा संचालित श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयात दरवर्षीप्रमाणे या वर्षीसुद्धा १२ व्या आंतरराष्ट्रीय योगदिनाचे आयोजन करण्यात आले होते. पतंजली योग समिती मोर्शीचे योगगुरु प्रशिक्षक म्हणुन नामदेव सातपुते यांनी योगासन व प्राणायामाचे प्रात्यक्षिकाद्वारे धडे दिले.

लोणी येथील सहजयोग परिवाराचे सर्व सहजयोगी अनुयायी सुद्धा या कार्यक्रमाकरिता





उपस्थित होते तसेच वरुड येथुन आलेल्या सहजयोगी परिवाराच्या वतीने तालुका समन्वयक अभिलाश चंबोळे व दिपक ठाकरे यांनी मानवी जीवनात मानसिक व शारीरिक आरोग्याकरिता ध्यान, आत्म साक्षात्कार व कुंडलीनी जागृतीचे महत्त्व समजावून सांगितले. यावेळी शाळेचे विद्यार्थी सुद्धा उत्साहाने सहभागी झाले. अगदी सकाळी पहाटे ६ च्या सुमारास अतिशय उत्साहवर्धक व मंगलमय वातावरणामध्ये या योगदिनाची सुरुवात झाली. उपस्थित सर्वांनी प्रात्यक्षिकात सहभाग घेतला.

मुख्याध्यापक एस.व्ही.खोडे, पर्यवेक्षक व्ही.एच.चिमोटे तसेच शाळेचे सर्व शिक्षक यांनी योगदिनाच्या यशस्वीतेकरिता सुंदर नियोजन केले. आलेल्या अतिथींचे शाळेच्या वतीने स्वागत व सत्कार करण्यात आला तसेच आभार मानल्या गेले. योगदिनाच्या कार्यक्रमाला उपस्थित सर्वांना भावी सुदृढ, निरोगी व निरामय जीवनाकरिता शालेय परिवाराच्या वतीने शुभेच्छा देवून कार्यक्रमाची सांगता झाली.

---

कोटा रँकर्सवर पालकांचा विश्वास

# पालकसभेत गुणवत्तापूर्ण शिक्षणाला पालकांची उत्स्फूर्त दाद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथील कोटा रँकर्स एकेडमी ही विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आणि स्पर्धात्मक शिक्षण देणारी विश्वासार्ह संस्था म्हणुन ओळख निर्माण करत आहे.



जेईई, नीट, सीईटी यांसारख्या स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन, अनुभवी शिक्षक आणि नियमित चाचण्यांच्या माध्यमातून सक्षम तयारी करुन दिली जाते, हाच विश्वास आज पालकांनीच दाखवुन दिला, आम्हाला आमच्या विद्यार्थ्यांचे भविष्य महत्वाचे असुन बाकी बाबींशी काळीमात्रही समंध नसल्याचे मत पालकांनी व्यक्त केले.

एकेडमीला अल्पावधीत उल्लेखनीय यश मिळाले असुन पालक व विद्यार्थ्यांमध्ये संस्थेबद्दल सकारात्मक वातावरण आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देत आधुनिक अध्यापन पद्धती, शिस्तबद्ध वातावरण आणि वैयक्तिक मार्गदर्शन यामुळे कोटा रँकर्सने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

अनेक विद्यार्थी एक महिन्याचे पूर्ण शिक्षण घेतल्यानंतर आपला प्रवेश निश्चित करतात या मागचा हेतु असा की, येथील शिक्षण समजत असेल तरच प्रवेश घ्या अन्यथा नाही असा आहे परंतु येथील अध्यापन पद्धती सर्वांना समजेल अशीच आणि बिनचुक असल्याने पालक व विद्यार्थ्यांची धाव कोटा रँकर्सच्या दिशेने आहे.

संस्थेचे संचालक व शिक्षकवर्ग विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असून, गुणवत्तापूर्ण शिक्षण हेच आमचे ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षण क्षेत्रात सकारात्मक कार्य करणाऱ्या संस्थांबाबत वस्तुनिष्ठ माहिती समाजासमोर येणे आवश्यक असल्याचेही मत संचालकांनी व्यक्त केले आहे.



“शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि त्यांचा प्रवेश निश्चित करणारे पालक हे आमच्यासाठी महत्वाचे आहे कारण ज्याला शिकायचे आहे आणि ज्यांना शिकवायचे आहे त्यांना जर कोणतीच अडचण नसेल तर बाकी सर्व गौण आहे, अशी प्रतिक्रिया संचालक रमेश कोरडे यांनी व्यक्त केली.

---

शेजाऱ्यासोबत सुरु असलेले भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या

# तरुणावर काठीने हल्ला : एकाविरुध्द गुन्हा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील मलकापूर भागात बहिणीच्या शेजाऱ्यासोबत सुरु असलेले भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या तरुणावर मागुन काठीने हल्ला करण्यात आल्याची घटना घडली आहे. या मारहाणीत तरुण गंभीर जखमी झाला असून पोलिसांनी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी गजानन श्रीकृष्णा धरमपेठ (३०) रा.वानाडोंगरी, ता.हिंगणा, जि.नागपूर हे १९ जून २०२६ रोजी दुपारी २ वाजता नागपूरवरुन शे.घाट येथे आपल्या बहिणीला भेटायला आले होते. त्याच वेळी त्यांचे मामा उमाकांत बानाबाकोडे यांनी फिर्यादीला सांगितले की, त्यांच्या बहिणीचे शेजारी राहणारे सुनील चिंचमलातपूरे यांच्याशी भांडण सुरु आहे, हे ऐकूण फिर्यादी गजानन, त्यांची बहीण आणि जावई सुरेश बानाबाकोडे हे सुनील यांच्या घरासमोर सुरू असलेले भांडण सोडवण्यासाठी गेले. भांडण सोडवत असतानाच, फिर्यादीच्या मागून सोमेश्वर हरीभाऊ भद्रे (३२) रा.मलकापूर हा लाकडी काठी घेऊन आला आणि त्याने गजानन यांच्या डोक्यावर मारली. काठी लागल्यामुळे गजानन हा गंभिर जखमी झाला.

या घटनेप्रकरणी जखमी गजानन यांच्या जबानी रिपोर्टवरुन पोलिसांनी आरोपी सोमेश्वर हरीभाऊ भद्रे याच्याविरुद्ध कलम ११८(१) बी.एन.एस.२०२३ अन्वये गुन्हा दाखल केला असून पो-लीस पुढील तपास करत आहेत.

---

# जनता शिक्षण संकूलात १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

निरोगी जीवनाची गुरुकिल्ली म्हणजे योग किशोर गडेकर यांचे प्रतिपादन

**शेंदुरजनाघाट** – येथील जनता शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयाच्या आयक्यूएसी विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, शारीरिक शिक्षण विभाग व जनता हायस्कूल व श्री एन.जी मोघे कनिष्ठ महाविद्यालय यांचे वतीने १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

वरुड येथील आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षक किशोर गडेकर व योगपटू रुद्रेश लोखंडे यांनी



उपस्थितांना योगासनाचे प्रशिक्षण दिले. वज्रासन, त्रिकोणासन, शीर्षासन, मयुरासन, जानुशिरासन, सर्वांगासन, वृक्षासन, नौकासन, भुजंगासन, धनुरासन, चक्रासन, मयुरासन व सूर्यनमस्कार अशा विविध प्रकारचे आसने त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व गावकरी मंडळी यांना शिकविले. आपले आरोग्य निरोगी व सुदृढ ठेवण्यासाठी त्यांनी योगाचे महत्त्व सांगितले.

यावेळी प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी, जनता हायस्कूल व श्री.एन.जी.मोघे कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मनोहर गणोरकर, पर्यवेक्षक उमेश काळे, क्रीडा शिक्षक योगेश सावरकर, प्रवीण गणोरकर, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.तिलकचंद धोटे, महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ.प्रशांत चर्जन, जनता शिक्षण संकूलातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, महाविद्यालयाचे आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपिक मनीष सावरकर यांनी राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता केली.

---

# तरुणीचा पाठलाग करुन त्रास देणाऱ्या युवकाविरुद्ध गुन्हा दाखल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – एका २४ वर्षीय तरुणीला तिच्या इच्छेविरुद्ध वारंवार पाठलाग करुन त्रास दिल्याप्रकरणी लोणी २५ वर्षीय युवकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ जून २०२६ रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी तरुणी तिच्या वडिलांसोबत असताना आरोपी तिच्यासमोर येऊन हसत होता. तसेच तिच्या इच्छेविरुद्ध तिच्या मागे-मागे येऊन तिला सतत त्रास देत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. या प्रकरणी तरुणीच्या तक्रारीवरून अजिंक्य सुभाषराव आकोटकर (२५) रा.लोणी याचे विरुध्द भारतीय न्याय संहिता कलम ७८ (१), ७८ (२) व ७८ (३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

---

मुलाला मारहाण केल्याच्या कारणावरुन

# मजुरावर हल्ला : एक जखमी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील सावंगी येथे मुलाला मारहाण केल्याच्या कारणावरुन झालेल्या वादातून एका मजुरावर लाकडी काठीने हल्ला करण्यात आल्याची घटना १९ जून रोजी घडली. या प्रकरणात एका विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीच्या घरासमोर आरोपी आला व फिर्यादीच्या मुलाला मारहाण केल्याच्या कारणावरुन शिवीगाळ करु लागला. त्यानंतर संतापलेल्या आरोपीने जवळील लाकडी काठीने फिर्यादीच्या डोक्यावर वार केला. हल्ल्यात फिर्यादीच्या डोक्याला दुखापत होऊन रक्तस्राव झाला. हल्ला थांबविण्याचा प्रयत्न करताना त्यांच्या उजव्या हाताच्या अंगठ्यालाही दुखापत झाली. घटनेची माहिती मिळताच फिर्यादीचा मुलगा मध्यस्थीसाठी आला असता त्यालाही शिवीगाळ करण्यात आली. याप्रकरणी अशोक विठोबाजी वाघाडे (२५) रा.सावंगी यांचे फिर्यादीवरुन पोलिसांनी निलेश लक्ष्णराव नांदणे (२८) रा.सावंगी याचे विरुध्द कलम ११८ (१), ३५१ (२) व ३५२ अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरु केला आहे.

---

# दुचाकी चोरी : अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

सुर्या कॉलनी परिसरातील घटना

**वरुड** – शहरातील सुर्या कॉलनी परिसरातून घरासमोर उभी असलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी वरुड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुर्या कॉलनी येथील ३९ वर्षीय व्यावसायिक यांनी त्यांची हिरो होंडा स्प्लेंडर प्लस क्र. एमएच २७ बीएस-५४५१ ही काळ्या रंगाची दुचाकी घरासमोर उभी केली होती. १७ जून रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ५ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने ही दुचाकी चोरुन नेली.

दुचाकीची किंमत सुमारे ३० हजार रुपये असल्याचे फिर्यादीने नमूद केले आहे.

बराच शोध घेतल्यानंतरही वाहनाचा शोध लागला नसल्याने फिर्यादीने वरूड पोलिस ठाण्यात तक्रार दिली. यासंदर्भात योगेश सुरेश देशमुख (३९) रा.सुर्या कॉलनी वरुड याचे फिर्यादीवरुन पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करुन पुढील तपास सुरु केला आहे.

# संपादकीय

**चला आपले आज आपण येणाऱ्या पिढीच्या उज्वल भविष्या साठी त्याग करू.**

## स्त्रीसुरक्षेसाठी मानसिकतेतील बदलाची गरज

भारतीय समाजात स्त्रीला देवीचे स्थान दिले जाते, तिची पूजा केली जाते, तिच्या त्याग, प्रेम आणि कर्तृत्वाचा गौरव केला जातो. परंतु दुसरीकडे, महिलांवरील अत्याचार, छेडछाड, लैंगिक हिंसा, कौटुंबिक अत्याचार आणि भेदभावाच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे चित्र दिसते. ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. कोणतीही स्त्री कुठल्याही ठिकाणी, कसल्याही कपड्यांत मुक्तपणे, आत्मविश्वासाने आणि सुरक्षितपणे वावरू शकेल अशी परिस्थिती निर्माण करणे ही केवळ शासनाची किंवा कायद्याची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. केवळ कठोर शिक्षा देऊन हा प्रश्न पूर्णपणे सुटणार नाही, तर समाजाच्या मानसिकतेत मूलभूत बदल घडवून आणणे अधिक आवश्यक आहे.

गेल्या काही वर्षांत देशभरात महिलांवरील अत्याचारांच्या अनेक धक्कादायक घटना घडल्या. निर्भया प्रकरणानंतर देशात मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन झाले. त्यानंतर कायद्यात अनेक बदल करण्यात आले, शिक्षेची तरतूद कठोर करण्यात आली, फास्ट ट्रॅक न्यायालयांची स्थापना करण्यात आली. तरीदेखील महिलांवरील गुन्ह्यांमध्ये अपेक्षित घट झालेली दिसत नाही. यावरून स्पष्ट होते की, केवळ कायद्याची भीती पुरेशी नाही. गुन्हे घडण्यामागे सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक घटकही तितकेच जबाबदार आहेत.

आजही समाजातील एक मोठा वर्ग स्त्रियांच्या वेशभूषेकडे, वागणुकीकडे आणि जीवनशैलीकडे संकुचित दृष्टीकोनातून पाहतो. अनेकदा महिलांवरील अत्याचारांच्या घटनांनंतर पीडितेलाच दोष देण्याची प्रवृत्ती दिसून येते. 'ती रात्री बाहेर का गेली?', 'तिने असे कपडे का घातले?', 'तिने एकटीने प्रवास का केला?' असे प्रश्न उपस्थित केले जातात. अशा प्रकारची मानसिकता अत्यंत घातक आहे. कोणत्याही स्त्रीच्या कपड्यांचा, तिच्या वेळेचा किंवा तिच्या स्वातंत्र्याचा तिच्यावर होणाऱ्या अत्याचाराशी कोणताही संबंध नाही. अत्याचार करणारी व्यक्ती आणि तिची विकृत मानसिकता हीच त्यामागील खरी कारणे आहेत.

स्त्री-पुरुष समानतेची भावना समाजात रुजविण्यासाठी बालपणापासूनच मुलांमध्ये योग्य संस्कार करणे आवश्यक आहे. घर हे मुलांचे पहिले शिक्षण केंद्र असते. त्यामुळे पालकांनी मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव न करता समानतेची वागणूक द्यावी. मुलांना महिलांचा आदर करणे, त्यांचा सन्मान राखणे आणि त्यांच्या स्वातंत्र्याचा स्वीकार करणे याचे शिक्षण दिले पाहिजे. मुलींना केवळ मर्यादा घालण्याऐवजी मुलांना जबाबदारी आणि संवेदनशीलता शिकविणे अधिक गरजेचे आहे. शैक्षणिक संस्थांचीदेखील या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये लैंगिक समानता, महिलांचे अधिकार, सामाजिक मूल्ये आणि संवेदनशीलता याविषयी नियमित मार्गदर्शन केले पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये परस्पर आदराची भावना विकसित करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणे आवश्यक आहे. शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे माध्यम नसून व्यक्तिमत्त्व विकासाचे साधन आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेत मूल्यशिक्षणाला अधिक महत्त्व दिले पाहिजे.

प्रसारमाध्यमे आणि सामाजिक माध्यमे यांचाही समाजाच्या मानसिकतेवर मोठा प्रभाव असतो. अनेकदा चित्रपट, मालिका किंवा सोशल मीडियावरील काही आशय महिलांविषयी चुकीची प्रतिमा निर्माण करतात. महिलांना केवळ आकर्षणाचे साधन म्हणून दाखविण्याची प्रवृत्ती थांबविणे आवश्यक आहे. माध्यमांनी स्त्रियांच्या कर्तृत्वाला प्राधान्य देत सकारात्मक आणि जबाबदार भूमिका निभावली पाहिजे. तसेच सोशल मीडियावरील महिलांविरोधातील अपमानास्पद भाषा, ट्रोलिंग आणि सायबर गुन्ह्यांवर कठोर नियंत्रण असणे गरजेचे आहे.

महिलांच्या सुरक्षेसाठी शासनानेही विविध पावले उचलली आहेत. महिला हेल्पलाइन, निर्भया निधी, फास्ट ट्रॅक न्यायालये, महिला पोलीस पथके यांसारख्या उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. मात्र, या यंत्रणा अधिक प्रभावी आणि संवेदनशील बनविण्याची गरज आहे. महिलांनी तक्रार केल्यानंतर त्यांना न्याय मिळेल, असा विश्वास निर्माण होणे आवश्यक आहे. पोलीस आणि न्यायव्यवस्थेनेही पीडित महिलांशी सहानुभूतीपूर्वक वागले पाहिजे.

स्त्रीसुरक्षेचा प्रश्न हा केवळ महिलांचा प्रश्न नसून संपूर्ण समाजाच्या प्रगतीशी निगडित आहे. ज्या समाजात महिला सुरक्षित, सन्मानित आणि स्वावलंबी असतात, तो समाज अधिक प्रगत आणि समृद्ध असतो. महिलांना भीतीच्या वातावरणात जगावे लागणे हे कोणत्याही सुसंस्कृत समाजासाठी लाजिरवाणे आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपल्या वर्तनातून आणि कृतीतून महिलांप्रती आदर व्यक्त करणे आवश्यक आहे.

# एकनाथ शिंदे पॉवरफुल्ल नेते होतायत!



एकनाथ शिंदे यांची ताकद वाढली आहे. शिंदे हे पक्षवाढीकरिता तुफान मेहनत घेत आहेत. सामान्यांचे प्रश्न केवळ फोनवर सोडवत आहेत. वेळप्रसंगी ते देवेंद्र फडणवीस यांच्याही पुढे जातील, अशी शंका व्यक्त केली जात आहे.

महायुतीमध्ये सध्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गेम पॉवरफुल ठरला असून दिल्ली दरबारी त्यांचे वजन वाढले आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे (उबाठा) च्या सहा खासदारांना आपल्याकडे खेचण्यात शिंदे यांना यश आले. शिवसेनेमधील शिंदे यांनी घडवलेले हे दुसरे बंड यशस्वी झाले असून आता सर्वांचे लक्ष उबाठाचे आमदार व नागरसेवकांकडे लागले आहे. मुंबई महापालिकेतील २० ते २२ नगरसेवक शिंदे यांच्याकडे येऊ शकतात. मात्र त्यांना फूट यशस्वी करण्याकरिता ४६ ते ४८ नगरसेवकांची आवश्यकता आहे, तर उबाठाच्या २० आमदारांपैकी १५ आमदार हे एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याचे खात्रीलायकरीत्या सांगण्यात येते. फुटलेल्या सहा खासदारांपैकी दोन खासदार हे उबाठाकडे परत येणार होते. परंतु उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी शिवीगाळ केल्याने हे दोन खासदार शेवटी शिंदे यांच्या गटातच राहिले.

शिवसेनेला बंड हे काही नवीन नाही. शिवसेनाप्रमुख हयात असताना बंड झाले, परंतु ते बाळासाहेबांनी मोडून काढले. सुरुवातीला शिंगरे बंधू यांनी बंड केले होते. त्यावेळी शिवसेनेची दहशत एवढी प्रचंड होती की शिंगरे बंधूंना चिलखत चढवून फिरावे लागले होते. हेमचंद्र गुप्ते, १९९१ मध्ये छगन भुजबळ, २००२ मध्ये नारायण राणे, २००४ मध्ये राज ठाकरे व त्यानंतर २०२२ मध्ये सत्तेत असताना आठ मंत्री व ४० आमदारांना घेऊन एकनाथ शिंदे यांनी ७५ टक्के शिवसेना फोडली. त्या दिवसापासून शिवसेनेला खऱ्या अर्थाने घरघर लागली. निवडणूक आयोगाने तर शिवसेना ही पूर्णपणे एकनाथ शिंदेंच्या दावणीला बांधली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी १९६६ मध्ये उभारलेली शिवसेना ही आयोगाने एकनाथ शिंदेंच्या हातात सोपवली. एवढेच नाही, तर त्यांची धनुष्यबाण ही निशाणी एकनाथ शिंदे यांना देऊन टाकली. त्यामुळे खऱ्या अर्थाने उद्धव ठाकरे हे पोरके झाले. ही अधोगती पुढे कायम राहिली. शिंदेंच्या बंडाने उद्धव ठाकरे यांचे मुख्यमंत्रीपदही गेले आणि त्यांना विधानसभेला सामोरे न जात मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. आता ९ पैकी ६ खासदार फुटले व शिंदेंच्या कळपात जाऊन बसले. अशा तऱ्हेने उबाठाचे पानिपत झाले आहे. मुख्य म्हणजे एवढे सगळे होऊनही उद्धव ठाकरे हे आत्मचिंतन करण्यास तयार नाहीत. उलट ते आपली शिवसेना काँग्रेसच्या कळपात नेऊन बांधायला इच्छुक दिसतात. कारण शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनी शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे-काँग्रेसमध्ये विलीनीकरण करून देशात एक नवी राजकीय शक्ती निर्माण केली पाहिजे, अशी भावना व्यक्त केली होती. शिवसेना नेस्तनाबूत करण्याचे काम संजय राऊत करत आहेत. उबाठाचे चारच खासदार शिंदेंच्या संपर्कात आहेत, असे बोलले जात होते. काठावर बसलेल्या दोन खासदारांना उबाठामध्ये परत आणणे अशक्य नव्हते. परंतु उद्धव यांनी त्याकरिता ठोस प्रयत्न तर केले नाहीच. पण संजय राऊत यांनी टीव्ही कॅमेऱ्यांसमोर या खासदारांना शिवीगाळ करून खेळ खराब केला. हीच परिस्थिती २०२२ मध्ये ४० आमदार फुटून बाहेर गेले तेव्हा झाली होती. त्यावेळीही संजय राऊत यांनी या आमदारांना रेड्याची उपमा देऊन त्यांना गुवाहाटी येथे बळी देण्यासाठी नेले असल्याची भाषा केली. त्यामुळे या आमदारांमध्ये संताप व्यक्त केला गेला. प्रादेशिक पक्षांनी राष्ट्रीय पक्षात विलीन व्हावे ही भूमिका राऊत यांनी मांडण्याची आवश्यकता नव्हती. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी जाहीरपणे म्हटले होते की, 'माझी शिवसेना काँग्रेस झाली तर मी ती बरखास्त करून टाकेन.' परंतु येथे तर मित्रपक्ष भाजपची साथ सोडून शिवसेनेने काँग्रेस पक्षाच्या मदतीने मुख्यमंत्रीपद मिळवले. तेथूनच खऱ्या अर्थाने शिवसेनेची घसरगुंडी झाली.

सन २०१९ मध्ये भाजप व शिवसेना यांनी एकत्रित विधानसभेची निवडणूक लढवली होती. उद्धव यांनी हिंदुत्व सोडून सर्वधर्म समभाव या आधारावर सत्ता स्थापन केली. अडीच वर्षे कोरोना काळात सत्ता उपभोगली. परंतु त्यानंतर शिवसेनेचा ऱ्हास होत गेला. अडीच वर्षांत मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे मंत्रालयातही जाऊ शकले नाहीत. अशी सत्ता व मुख्यमंत्रीपद मिळवून उद्धव यांनी काय साध्य केले?

शिवसेनेचा ६० वा वर्धापन दिन उद्धव ठाकरे यांनी षण्मुखानंद सभागृहात, तर एकनाथ शिंदे यांनी गोरेगावमध्ये साजरा केला. ६० वा वर्धापन दिन म्हणजे पोक्त विचार आणि वृद्धत्वाकडे वाटचालीचे वर्ष. परंतु या दोन्ही मेळाव्यात ठाकरे-शिंदे यांनी निव्वळ परस्परांवर आरोप-प्रत्यारोप केले. उद्धव ठाकरे यांनी तर शेवटी भावविवश होऊन तुम्ही सांगा मी घरी बसतो, असे उदगार काढले. शिंदे यांनी प्रत्युत्तर देताना 'ये तो ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है' असे सांगून पुढील फुटीचे सूतोवाच केले. उद्धव ठाकरे म्हणाले की, सुरुवातीच्या काळात आम्हाला काँग्रेसने त्रास दिला. मात्र त्यानंतर काँग्रेसशी आमचे चांगले संबंध राहिले. त्याला प्रत्युत्तर देताना शिंदे यांनी काँग्रेसने शिवसेना कशी फोडली, याची उदाहरणे दिली. उद्धव ठाकरे यांनी काँग्रेसचे रजनी पटेल यांचा उल्लेख केला. रजनी पटेल त्यावेळी मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांनी शिवसेना हा फॅसिस्ट पक्ष आहे व त्यावर बंदी आणावी, अशी मागणी केली होती. दिल्लीत त्यावेळी इंदिरा गांधींची सत्ता होती. शिवसेनेवर बंदी येणार हे जवळ जवळ निश्चित झाले होते. परंतु मुरली देवरा, बॅ. अंतुले यांनी मध्यस्थी केल्याने ती बंदी टळली. त्याच्या बदल्यात शिवसेनाप्रमुखांनी जाहीरपणे आणीबाणीचे समर्थन केले.

छगन भुजबळ यांनी काही आमदारांसह शिवसेना सोडली तेव्हा नागपूर अधिवेशनात सुधाकरराव नाईक यांनी भुजबळ यांना व त्यांच्या समर्थकांना संरक्षण दिले. भुजबळ मंत्रीही झाले. पुढे मुख्यमंत्री राहिलेले नारायण राणे यांनी शिवसेना सोडली ती काँग्रेसच्या आशीर्वादानेच. शिवसेना सोडताना त्यांना महसूल मंत्रीपद दिले. अशी अनेक उदाहरणे देता येतील. या सभेत एकनाथ शिंदे यांनी सहा खासदार फुटून आले यावर फारसा जोर दिला नाही. विधान परिषदेच्या ११ जागांसाठी शुक्रवारी मतदान झाले. तत्पूर्वी महायुतीने ६ जागा बिनविरोध जिंकल्या आहेत, तर ११ जागांवर विरोधकांचे पानिपत होईल असा विश्वास महायुतीच्या नेत्यांनी व्यक्त केला आहे.

शिवसेनेचा पाया प्रथम मुंबईपुरता मर्यादित होता. प्रारंभी उडप्याच्या विरोधात आंदोलन केले. त्यांच्या हॉटेल व व्यवसायांवर दगडफेक केली. मुंबई ही सोन्याची अंडी देणारी कोंबडी असल्याने मुंबई महापालिकेवर शिवसेनेने अनेक वर्षे कब्जा केला होता. परंतु २०२५ मध्ये मुंबईतील शिवसेनेची सत्ता धुळीला मिळाली आणि तेथे भाजपने सत्ता ताब्यात घेतली. तीच परिस्थिती राज्यातील १९ महापालिकांमध्ये झाली. शिवसेनेकडे मुंबईनंतर संभाजीनगरची सत्ता होती. मोरेश्वर सावे हे एकेकाळी शिवसेनेचे पहिले महापौर झाले. परंतु मातोश्रीच्या वाढत्या नियंत्रणामुळे सावे शिवसेना सोडून गेले. आता त्यांचे चिरंजीव अतुल सावे भाजपचे मंत्री आहेत. असे अनेक मोहोरे शिवसेना सोडून गेले. मनोहर जोशी यांना कुठलेही कारण नसताना मुख्यमंत्रीपदावरून काढले. रातोरात ते दादरला निघून गेले. एवढ्या मोठ्या ज्येष्ठ नेत्याला शिवाजी पार्कच्या सभेत अपमानित केले गेले. स्टेजवरून उतरताना त्यांचे डोळे पाणावले होते. हा इतिहास उद्धव यांच्या काळातला आहे. ज्यांनी आयुष्यभर बाळासाहेबांची साथ सोडली नाही त्यांची अवस्था अशी झाली होती. अशी असंख्य उदाहरणे देता येतील.

नारायण राणे, राज ठाकरे हे शिवसेना सोडून बाहेर पडले. राज यांनी माझ्या विठ्ठलास बडव्यांनी घेरले असल्याचा उल्लेख केला होता. आता तीच स्थिती उद्धव ठाकरे यांची आहे. शिवसैनिकांमध्ये संजय राऊत यांच्याबद्दल तीव्र नाराजी आहे. परंतु एवढे झाल्यानंतरही उद्धव ठाकरे आत्मचिंतन करण्यास तयार नाहीत. एकनाथ शिंदे यांची ताकद वाढली आहे. शिंदे हे पक्षवाढीकरिता तुफान मेहनत घेत आहेत. सामान्यांचे प्रश्न, चिठ्ठ्या-चपाट्या, नुसत्या फोनवर काम करून देतात. हे लोकांच्या लक्षात आल्याने त्यांच्यामागे प्रचंड गर्दी असते. वेळ प्रसंगी ते देवेंद्र फडणवीस यांच्याही पुढे जातील, अशी शंका व्यक्त केली जात आहे.

# आरोग्य सेवांमधील प्रगतीची १२ वर्षे

राष्ट्रीय आरोग्य धोरण-२०१७ ने एक दिशा निश्चित केली, राष्ट्रीय आरोग्य मिशनअंतर्गत, उप आरोग्य केंद्रातील डिलिव्हरी पायाभूत सुविधा प्रदेश स्तरावरील रुग्णालयांपर्यंत विस्तारल्या आणि आयुष्मान भारतने त्या व्यवस्थेला, चार महत्वाचे कार्यरत स्तंभ दिले.

आरोग्य व्यवस्था उत्तम असल्या, तर वित्तीय उत्पादन, मनुष्यबळाचा अधिक सहभाग, आणि पर्यायाने शाश्वत, दीर्घकालीन वृद्धी, हे सगळे साध्य केले जाऊ शकते. म्हणूनच, उत्तम आरोग्य, हे केवळ सामाजिक स्वास्थ्यासाठी आवश्यक नाही, तर ती राष्ट्राची संपत्तीही आहे- असा पाया, ज्यावर, मानवी क्षमता उभारल्या जातात आणि राष्ट्रांचे सामर्थ्य मोजले जाते. म्हणूनच ही केवळ सामाजिक कल्याणाची बाब नाही, तर एक राष्ट्रीय संपत्ती आहे, म्हणूनच, यासाठी खर्च केलेला प्रत्येक पैसा देशाच्या नागरिकांसाठी केलेली गुंतवणूक आहे.

म्हणूनच, सार्वत्रिक आरोग्य विमा सुरक्षा- सर्व लोकांना, मग त्यांचा आर्थिक-सामाजिक स्तर काहीही असला तरी, त्यांना आवश्यक त्या सर्व प्रकारच्या दर्जेदार आरोग्य सेवा, त्यांना जिथे आणि जेव्हा हव्या असतील, तेव्हा मिळतात, त्यासाठी त्यांना कोणतीही आर्थिक तोषीस सहन करावी लागत नाही. हे केवळ २०३० पर्यंत पूर्ण करण्याचे शाश्वत विकासाचे उद्दिष्ट नाही तर, ते आरोग्यविषयक प्राधान्य आहे.



भारताचे राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७ (छकझ २०१७) सार्वत्रिक आरोग्य विमा व्याप्ती साध्य करण्याच्या उद्दिष्टाशी तसेच, शाश्वत विकास उद्दिष्ट तीनशी संलग्न असून त्यामागे एक दृढविश्वास आहे - आरोग्य प्रत्येक व्यक्तीच्या आवाक्यातली गोष्ट असावी. त्याचे चार स्तंभ -परवडणारे दर, सुलभ उपलब्धता, गुणवत्ता, सगळ्यांना सहज उपलब्धता या तत्वाद्वारे ह्या दृढविश्वासाचे रूपांतर कृतीत होऊन, सर्व नागरिकांना सर्व काळ, सर्वसमावेशक आरोग्य सुविधा मिळत आहेत. या उद्दिष्टाशी संलग्न होत, राष्ट्रीय आरोग्य मिशनद्वारे राज्यांना एक अत्यंत एकात्मिक त्रिस्तरीय आरोग्य यंत्रणा मॉडेल विकसित करून, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी पाठबळ दिले जाते.

प्राथमिक स्तरावर, आयुष्मान आरोग्य मंदिराद्वारे, प्रतिबंधात्मक, आरोग्यसंवर्धनात्मक, उपचारात्मक, पुनर्वसनात्मक आणि उपशामक अशा सर्वसमावेशक आरोग्यसेवा पुरविल्या जातात. ई-संजीवनी या टेलिमेडिसिन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता सुनिश्चित करण्यात येते. या व्यासपीठाद्वारे आयुष्मान आरोग्य मंदिरांमधून रुग्णांना थेट विशेषज्ञ डॉक्टरांशी जोडले जाते, ज्यामुळे दुर्गम भागातील नागरिकांनाही तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला सहज उपलब्ध होतो. याशिवाय, मानसिक आरोग्य सेवांसाठी सुरू करण्यात आलेल्या टेली-मानस (ढशश्रश-चअछअड) या विशेष प्लॅटफॉर्मने आजपर्यंत एकूण ३८.९३ लाखांहून अधिक संपर्क नोंदवले आहेत. आयुष्मान आरोग्य मंदिरांशी जोडलेल्या द्वितीय स्तरावरच्या आरोग्य सुविधा म्हणजे, सामुदायिक आरोग्य केंद्रे (उकउ)/ फर्स्ट रेफरल युनिट (ऋठण) आणि जिल्हा रुग्णालये, जे फर्स्ट पॉइंट ऑफ रेफरल, म्हणजेच, प्राथमिक आरोग्य सुविधा केंद्रांमधून रुग्णांना वैयक्तिक पातळीवर विशेषज्ञ आणि रुग्णालय चिकित्सा सुविधा उपलब्ध होऊ शकतील.

या त्रिस्तरीय आरोग्य प्रणालीला आणखी पाठबळ देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विषयक तरतुदीत वाढ करण्यात आली असून, राष्ट्रीय आरोग्य मिशन साठीच्या खर्चात, गेल्या दशकभरात १६८% ची वाढ झाली आहे. यातून सरकारची, आरोग्यक्षेत्राला राष्ट्रीय प्राधान्यक्रमात वरच्या स्थानी ठेवण्याची कटिबद्धताच दिसून येते.मे २०२६ पर्यंत, देशभरात १.८ लाख आयुष्मान आरोग्य मंदिरे कार्यान्वित झाली असून त्याद्वारे सर्वांना अगदी दाराशी आरोग्यसेवा उपलब्ध झाल्या आहेत. या विस्ताराची व्याप्ती, आरोग्य मंदिरांमधील १२० कोटी बाह्यरुग्ण तपासणी आणि ७० कोटींपेक्षा अधिक ई-संजीवनी टेलि-वैद्यकीय सल्ला, त्याशिवाय, सुदृढ शरीर आणि कल्याण याला प्रोत्साहन देण्यासाठी, ४६.१ कोटी निरामयता सत्रे अशा आकडेवारीतून ही व्याप्ती सहज लक्षात येऊ शकते.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनावर संकट?

## आर्थिक मदत न मिळाल्यास पुढील महिन्यात लालपरीची चाकेही थांबण्याची भीती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) अभूतपूर्व आर्थिक संकटाचा सामना करत आहे. तातडीची आर्थिक मदत मिळाली नाही तर पुढील महिन्यात कर्मचाऱ्यांचे वेतन देणे अशक्य होईल. एवढेच नव्हे, तर इंधन, दुरुस्ती आणि दैनंदिन खर्चासाठी निधी उपलब्ध नसल्याने एसटीची सेवा ठप्प होण्याची भीती महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसकडून व्यक्त करण्यात येत आहे. एसटी व्यवस्थापनाने विविध मार्गांनी आर्थिक जुळवाजुळव करून कर्मचाऱ्यांना केवळ नक्त वेतन देण्याचा प्रयत्न केला. मात्र आता सर्व पर्याय संपुष्टात आले असून महामंडळाची आर्थिक स्थिती अत्यंत चिंताजनक बनली आहे. एसटीवर डिझेल पुरवठादार, सुटे भाग, टोल, दुरुस्ती व देखभाल तसेच भाडेतत्त्वावरील बसेसची देयके मोठ्या प्रमाणात थकीत आहेत. दुसरीकडे कर्मचाऱ्यांच्या भविष्यनिर्वाह निधी (पीएफ), ग्रॅच्युइटी, रजा रोखीकरण, वैद्यकीय व प्रवास भत्ते तसेच बँक कर्जाच्या हप्त्यांची रक्कमही संबंधित संस्थांकडे जमा करण्यात आली नसल्याचे एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी सांगितले. डिसेंबर २०२५ ते मे २०२६ या कालावधीत कर्मचाऱ्यांची तब्बल ६३३ कोटी २ लाख रुपयांची देणी थकीत झाली असल्याचा दावा बरगे यांनी केला.

# अहमदाबादहून चोरीस गेलेली कार जळगावात जप्त

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**जळगाव** – गुजरातमधील अहमदाबाद येथून चोरीस गेलेली सुमारे ९ लाख रुपये किमतीची कार जळगाव पोलिसांनी थरारक पाठलाग करून जप्त केली. एमआयडीसी पोलिसांनी कारचालकाला ताब्यात घेतल्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ही कार गुजरात पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आली. अहमदाबाद ग्रामीण हद्दीतील बोपल पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातून १५ एप्रिल रोजी ही कार चोरीला गेली होती. याप्रकरणी तेथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, १८ जून रोजी सायंकाळी ही चोरीची कार जळगावच्या दिशेने येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार वाहतूक शाखेच्या पथकाने काशिनाथ चौक येथे नाकाबंदी केली.

पोलिसांनी वाहन थांबविण्याचा इशारा दिल्यानंतरही चालकाने कार न थांबवता ती भरधाव वेगाने अजिंठा चौफुलीकडे पळवली. पोलिसांनी तत्काळ पाठलाग करून अजिंठा चौफुली येथे कार अडवली आणि चालकाला ताब्यात घेतले.

## अनिलकुमार स्मृती पत्रकारिता पुरस्कार

# जेष्ठ पत्रकार गिरीधर देशमुख यांना जाहीर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – स्वातंत्र्यपूर्व काळातील ज्येष्ठ कवी, विचारवंत व पत्रकार दिवंगत अनिलकुमार यांच्या स्मृतीला उजाळा देण्यासाठी अनिलकुमार स्मृती पत्रकारिता पुरस्कार देण्यात येतो.

विदर्भगौरव प्रतिष्ठान आणि नागपूर श्रमिक पत्रकार संघाच्यावतीने विदर्भातील पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांना या पुरस्काराने गौरविण्यात येते. प्रत्येकी रोख २१ हजार रुपये, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यंदाचा पुरस्कार येथील जेष्ठ पत्रकार गिरीधर देशमुख, मोहन अटाळकर, नरेश डोंगरे यांना जाहीर झाला आहे.

गिरिधर देशमुख हे ५० वर्षापासुन पत्रकारीता क्षेत्रात काम करीत आहे. त्यांना आतापर्यत अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. संत्रा उत्पादकांच्या कथा व व्यथा,तसेच वरुड व मोवाड पुरग्रस्तासाठी केलेल्या लिखाणावर महाराष्ट्र शासनाने त्यांना विकास वार्ता पुरस्कार देऊन १९९५ मध्ये मंत्रालयात सन्मानित केले होते. त्यानंतर त्यांना असंख्य पुरस्कार त्यांच्या समाजसेवेबद्दल आध्यात्मिक, शैक्षणिक, सामाजिक तसेच साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल महाकवि कालिदास प्रतिष्ठान पुरस्कार, जीवन गौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

राजकिय घडामोडीचे बेधडक बिनधास्त लेखन करून पत्रकारीता क्षेत्रात मानाचे स्थान त्यांना प्राप्त आहे. गिरिधर देशमुख यांना स्व.अनिलकुमार यांच्या स्मृतिदिनी १३ सप्टेंबरला नागपुरला प्रदान करण्यात येणार आहे. देशमुख यांना मिळालेल्या पुरस्कारबददल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केल्या जात आहे.

# 'दुष्काळाच्या छायेत पूल पार्टी अयोग्य': मंत्री सरनाईक यांची आमदार मेहतांवर टीका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यात पावसाने अद्याप समाधानकारक हजेरी न लावल्याने अनेक भागांत पाणीटंचाईची स्थिती निर्माण झाली असताना, मीरा-भाईदरमधील '७११ क्लब'मध्ये प्रस्तावित पूल पार्टीवरून राजकीय वातावरण तापले आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी भाजपचे आमदार नरेंद्र मेहता यांच्यावर जोरदार टीका करत शिवसैनिकांना या कार्यक्रमाचा विरोध करण्याचे आवाहन केले आहे. संपूर्ण महाराष्ट्र पावसाच्या प्रतीक्षेत असून अनेक भागांत पाणीटंचाईची समस्या तीव्र झाली आहे. अशा परिस्थितीत मीरा रोड येथील '७११ क्लब'मध्ये २७ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या पूल पार्टीवर आक्षेप घेत मंत्री प्रताप सरनाईक यांनी हा प्रकार जनतेच्या भावनांशी विसंगत असल्याचे म्हटले आहे.

मीरा-भाईदरमध्ये नागरिकांना दोन-दोन दिवस पाणी मिळत नसल्याचा उल्लेख करत सरनाईक यांनी, जनतेच्या थेंब-थेंब पाण्यासाठी शिवसेनेने यापूर्वी 'टमरेल आंदोलन' केले होते, असे सांगितले. शहरात पाणीटंचाई असताना हजारो लिटर पाण्याचा वापर करून पूल पार्टी आयोजित करणे ही असंवेदनशीलता असल्याची टीका त्यांनी केली.

दरम्यान, भाजपचे आमदार नरेंद्र मेहता यांनी या आरोपांना उत्तर देताना सांगितले की, '७११ क्लब'मधील संबंधित कार्यक्रमाचे बुकिंग सुमारे चार महिन्यांपूर्वी एका इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीमार्फत करण्यात आले होते.

त्यावेळी पावसाची परिस्थिती काय असेल, याचा अंदाज नव्हता. मात्र, सध्याची पाणीटंचाई लक्षात घेऊन हे बुकिंग रद्द करण्यात आले असून संबंधित इव्हेंट कंपनीने समाजमाध्यमांवरील जाहिरातीही हटवल्या आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. शहरात अनेक महिला व अल्पवयीन मुलींवर लैंगिक शोषणांच्या संदर्भात गुन्हे दाखल होत आहेत. अशाच पूल पार्ट्यांमुळे गुन्हे घडणार नाही याची दखल सुद्धा पोलीस प्रशासनाने घ्यावी, असे आवाहन मंत्री सरनाईक यांनी केले आहे.

पालिका प्रशासनाने कठोर भूमिका घ्यावी मीरा-भाईदर शहराला सूर्या प्रकल्पातून मिळणारे २१८ एमएलडी पाणी गेल्या तीन वर्षांपासून विविध कारणांमुळे मिळू शकले नसल्याचाही आरोप त्यांनी केला.

जनतेच्या हक्काच्या पाण्याची उधळपट्टी करणाऱ्या अशा कार्यक्रमांविरोधात महानगरपालिका प्रशासनाने कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली. तसेच अशा कार्यक्रमांमुळे समाजात चुकीच्या प्रवृत्तींना प्रोत्साहन मिळू नये, यासाठी पोलीस प्रशासनानेही दक्षता घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

# बीएलओ एसआयआर ड्युटीविरोधात शिक्षक भारती करणार आंदोलन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना बीएलओ एसआयआर ड्युटी देण्यात येत असल्याने याला शिक्षण क्षेत्रातून विरोध होत आहे. या विरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची तयारी करण्यात येत आहे. येत्या आठ दिवसांत प्रशासनातर्फे याबाबत चर्चा करण्यास वेळ न दिल्यास मोठे आंदोलन उभे करण्यात येईल, असा इशारा शिक्षक भारतीचे कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी दिला आहे.

बीएलओ ड्युटी अन्याय निवारण मंचच्या वतीने नंदादीप हायस्कूल, गोरेगाव येथे संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक भारती, बृहन्मुंबई शिक्षकेतर कर्मचारी संघटना आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची जाहीर सभा शनिवारी आयोजित करण्यात आली होती. या सभेत बोलताना सुभाष मोरे यांनी हा इशारा दिला.

याप्रसंगी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष व मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.भालचंद्र मुणगेकर यांनी शाळा सुरू झाल्यानंतर शिकवू पाहणाऱ्या शिक्षकांना अशैक्षणिक कामात जुंपणाऱ्या सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय? असा प्रश्न उपस्थित केला. माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाताची चौकशी करणारा एफआयआर दाखल करण्यासाठी पोलिसांना शक्य झाले नाही.

## न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूलमध्ये

# आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**वरुड** – न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक पोच्छी उपस्थित होते. यावेळी सर्व शिक्षक तसेच विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात योगासनांच्या प्रात्यक्षिकांनी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध योगासने सादर करून योगाचे महत्त्व अधोरेखित केले. मुख्याध्यापक पोच्छी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नियमित योगाभ्यास केल्याने शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते, असे सांगितले.

त्यांनी विद्यार्थ्यांना निरोगी जीवनशैली अंगीकारण्याचा संदेश दिला. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दल जागरुकता निर्माण झाली असून सर्वांनी नियमित योग करण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शाळेतील शिक्षकांच्या सहकार्याने करण्यात आले.

## स्व.पंचफुलाबाई पावडे महिला महाविद्यालयात

# आंतरराष्ट्रीय योग दिन संपन्न



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्व.पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सकाळच्या योगसत्राची सुरुवात प्राचार्य डॉ.लिना गावंडे यांनी करो योग रहो निरोग या संकल्पनेवर प्रकाश टाकुन योगाचे अन्ययसाधारण महत्व विषद करुन केली. याप्रसंगी प्रा.डॉ.मनोज राठोड यांनी उपस्थित्यांकडून योगासने करुन घेतली तर रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.अरविंद तट्टे यांनी प्राणायम व ध्यान यांची प्रात्यक्षिके उपस्थित्यांकडुन करुन घेऊन त्याचे महत्व विषद केले. प्रा.डॉ.विवेक देशमुख, प्रा.डॉ.अनिल कडू, प्रा.डॉ.प्रदीप ढोले, ग्रंथपाल प्रा.डॉ.कविता इंगळे, प्रा.डॉ.फरहीना शिरीन, प्रशांत इंगळे, प्रफुल्ल किटुकले, लक्ष्मण सावलकर व इंदिरा खेरडे उपस्थित होते.

# खरी संपत्ती शरिराचे रक्षण श्वासाच्या माध्यमाने करायचे आहे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## योगगुरु गिरीधर देशमुख यांचे आंतरराष्ट्रीय योग दिनी प्रतिपादन







**वरुड** – शरीरच खऱ्या अर्थाने आपली संपत्ती आहे तिचे रक्षण श्वासाच्या माध्यमाने करायचे आहे. दररोज अर्धा तास योग आणी २४ तास प्रफुल्लित राहा, असा उपदेश जिल्हा प्रभारी गिरिधर देशमुख यांनी दिला.

ते वरुड नगर परिषदेच्या मैदानावर आयोजित १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनी योग महोत्सवात बोलत होते, प्रेरणात्मक गीतांनी योग महोत्सवाची सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमाचे उदघाटन नगराध्यक्ष इंजि.ईश्वर सलामे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, डॉ.शरद देशमुख चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ.विजय देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी डॉ.विजय देशमुख यांना पुरस्कार जाहीर झाल्याबददल त्यांचा गौरव करण्यात आला.

याप्रसंगी जागतिक योग दिनाच्या पार्श्वभूमीवर स्वाती गडेकर, किशोर गडेकर, निता पाटील, प्रकाश बेलसरे, पुष्पा बेलसरे, नम्रता साबळे, आशा खेरडे, निशा पानसे, रेखा पोकळे, हिमानी आजनकर, प्रमोद पाटील, राम डोंगरे, अशोक राऊत, सरीता चौधरी, दिया ताटर, क्रीशीका व कृष्णाली निमजे यांनी योग प्रात्यक्षिक सादर केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शेकडो योग पहाटेच्या सुमारास नगरपालिकेच्या मैदानावर हजेरी लावलेली होती. याप्रसंगी व्यासपीठावर व्यापारी संघाचे कार्याध्यक्ष रितेश शाह, जगदीश उपाध्याय, पूनम जैन, अनमोल जैन, वैशाली मोरस्कर व्यासपीठावर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन गिरिधर देशमुख व स्वाती गडेकर यांनी केले. कार्यक्रमांमध्ये वरुड व्यापारी संघ, कन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स, कँट महिला विंग, गायत्री परिवार, इंडियन मेडिकल असोसिएशन यांचा सहभाग होता तर शहरातील पतंजली योग समिती अंतर्गत चालणारे स्वामी रामदेव बाबा योग केंद्र, सांस्कृतिक भवन योग केंद्र, निसर्गरम्य एनटीआर हायस्कूल योग केंद्र, ओम साई योग केंद्र, संत अच्युत बाबा देवस्थान योग केंद्रातील शेकडो महिलांनी या जागतिक योग दिनामध्ये योगाभ्यास केला. योग शिबिरार्थी उत्साहाने या योग दिनाच्या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या. कार्यक्रमाला पतंजलिचे संरक्षक रितेश शाह, शेषराव कडु, जगदिश उपाध्याय, प्रमोद पाटील, प्रशासन अधिकारी विनोद बारस्कर, आरोग्य अधिकारी सुरेंद्र चोचमकर, निखिल अग्रवाल, नरेंद्र वऱ्होकर उपस्थित होते.

# उशिरा पोहोचल्याने विद्यार्थी मुकले परीक्षेला : इतर केंद्रांवर परीक्षा सुरळीत, भौतिकशास्त्र कठीण असल्याचा दावा

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई –** राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (नीट) रविवारी मुंबईतील विविध केंद्रांवर सुरळीत पार




पडली. मात्र काही मिनिटे उशिरा परळ येथील पोहोचलेल्या दोन महर्षी दयानंद विद्यार्थ्यांना परीक्षेला महाविद्यालय मुकावे लागेल. विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर परीक्षेला बसू द्यावे, यासाठी येथे काही वेळ पालकांनी गोंधळ घातला, तर या परीक्षेत भौतिकशास्त्र पेपर कठीण असल्याचा दावा विद्यार्थ्यांनी केला. देशभरात नीट परीक्षा ३ मे रोजी घेण्यात आली होती. मात्र, या परीक्षेचा पेपर फुटल्याचे स्पष्ट होताच ही परीक्षा रद्द करण्यात आली. त्यानंतर रविवारी फेरपरीक्षा आयोजित करण्यात आली होती. मुंबईतील सुमारे ६३ केंद्रांवर ही परीक्षा रविवारी पार पडली. दुपारी दोन वाजता सुरू होणाऱ्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी दीड वाजेपर्यंत संबंधित केंद्रांवर पोहोचावे, अशा सूचना एनटीएकडून देण्यात आल्या होत्या. दीड वाजेनंतर विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नसल्याची सूचना विद्यार्थ्यांना देण्यात आली होती.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५०६/२०२६ ने.ता.२९/०७/२०२६**

**अर्जदार :-**

१)श्रीराम राजश्री संजयराव काळे, वय अं.४२ वर्ष,धंदा-घरकाम

२)कुणाल संजयराव काळे, वय अं.२१ वर्ष, धंदा- मुलगा

क्र.१ व २ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत संजय विनायकराव काळे हे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२९/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५०५/२०२६ ने.ता.२४/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) अनिल रमेशराव कडू, वय अं.३८ वर्ष, धंदा- मजुरी, २) सुनिल रमेशराव कडू, वय अं.३७ वर्ष, धंदा- मजुरी, ३) सागर रमेशराव कडू, वय अं.३३ वर्ष, धंदा- मजुरी, ४) संगिता राजु गोरडे, वय अं.४७ वर्ष, धंदा- गृहिणी, ५) सुनिता मनोज चौधरी, वय अं.३५ वर्ष, धंदा- गृहिणी, क्र.१ ते ५ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, ६) कविता रोशन सुकलकर, वय अं.३५ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.नेरपिंगळाई, ता.मोर्शी, ७) वनिता केशवराव आजनकर, वय अं.४० वर्ष, धंदा- गृहिणी, रा.लोणी

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रमेश बाळकृष्ण कडू व मयत शांता रमेश कडू, रा.शेंदुरजनाघाट, ता.जि.पांढुर्णा** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५०४/२०२६ ने.ता.२८/०७/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीराम रामसुमेर कनोजे, वय अं.६१ वर्ष, धंदा-मजुरी

२) देवराम रामसुमेर कनोज, वय अं.७० वर्ष, धंदा- मजुरी

क्र.१ व २ रा.मांगरुळी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रामसुमेर रामेश्वर कनोजे, रा.मांगरुळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२८/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५०७/२०२६ ने.ता.२७/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) फगणी ढेपल्या पिंजारे, वय अं.७० वर्ष, धंदा- शेती, २) कला शंकर पिंजारे, वय अं.३५ वर्ष, धंदा- शेती, ३) कु.सलोनी शंकर पिंजारे, वय अं.१६ वर्ष, धंदा- शिक्षण, ४) स्वास्तिक शंकर पिंजारे, वय अं.१३ वर्ष, धंदा- शिक्षण, क्र.१ ते ४ रा.पेंडोणी, ता.जि.पांढुर्णा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत शंकर ढेपल्या पिंजारे, रा.पंडोणी, ता.जि.पांढुर्णा** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२७/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# १ हजार कोटी मालमत्ता जप्त, गोव्यात ईडीची कारवाई : बेकायदेशीर लोहखनिज उत्खनन प्रकरण

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***नवी दिल्ली –*** गोव्यातील एका कथित बेकायदेशीर लोहखनिज उत्खनन प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) रविवारी सिंगापूरमधील




मालमत्तांसह १,०२३ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीची मालमत्ता जप्त केल्याचे सांगितले. ‘ईडी’ने सांगितले की, साळगावकर समूह आणि त्यांच्याशी संबंधित कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर केलेल्या बेकायदेशीर लोहखनिज उत्खननाशी संबंधित प्रकरणात मनी लॉंड्रिंग प्रतिबंधक कायदा (पीएमएलए) अंतर्गत १९ जून रोजी एक तात्पुरता आदेश जारी करण्यात आला आहे. ईडीच्या माहितीनुसार, जप्त केलेल्या मालमत्तांमध्ये भारतामधील ९९ स्थावर मालमत्ता (४५९.१० कोटी रुपये), सिंगापूरमधील ३१ स्थावर मालमत्ता (४७१.३२ कोटी रुपये) आणि भारतीय कंपन्यांमधील समभाग (९३.४२ कोटी रुपये) यांचा समावेश आहे. या मालमत्ता ‘इस्टेट ऑफ लेट अनिल साळगावकर’ (प्रशासक लक्ष्मी अनिल साळगावकर यांच्या माध्यमातून), साळगावकर मायनिंग इंडस्ट्रीज, शांतीलाल खुशालदास अँड ब्रदर्स, एस कांतीलाल अँड कंपनी, सालिथो ओर्स, व्हर्टेक्स न्यूटन प्रोजेक्ट्स आणि सुवर्णरेखा पोर्ट यांच्या नावावर आहेत. मनी लॉंड्रिंगचा हा तपास गोवा पोलिसांच्या सीआयडीने नोंदवलेल्या गुन्ह्यावरून सुरू झाला आहे. ईडीने सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने २०१४ आणि २०१८ मधील आपल्या निकालांमध्ये स्पष्ट केले होते की, २२ नोव्हेंबर २००७ नंतर गोव्यात झालेले सर्व खाणकाम बेकायदेशीर होते.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४६७/२०२६ ने.ता.२८/०७/२०२६**

**अर्जदार :-** सौ.आशा संतोषराव विघे, वय अं.६२ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.वार्ड क्र.३ हातुर्णा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** १) श्रीमती माहेश्वरी सचिन विघे, वय अं.३४ वर्ष, धंदा-गृहिणी, २) सर्वज्ञ सचिन विघे, वय अं.६ वर्ष, धंदा- शिक्षण, ३) कु.अवणी सचिन विघे, वय अं.३ वर्ष, धंदा-काही नाही, (गैरअर्जदार क्र.१ ही स्वत: करीता व अ.पा.क म्हणून गैरअर्जदार क्र.२ व ३ करीता) रा.बोरगांव (टुमणी) ता.आष्टी

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत सचिन संताषराव विघे, रा.हातुर्णा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२८/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१७/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४९८/२०२६ ने.ता.२८/०७/२०२६**

**अर्जदार :-**

श्रीमती सुशिला गुलाब मानेकर

वय अं.७० वर्ष, धंदा- गृहिणी

रा.बेनोडा (शहीद), ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत गुलाब रामाजी मानेकर, रा.बेनोडा (शहीद), ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२८/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१९/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४६३/२०२६ ने.ता.०३/०८/२०२६**

**अर्जदार :-**

भारती दानाजी हिंगवे

वय अं.३९ वर्ष, धंदा- शेती

रा.एकलविहीर, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत दानाजी लहराम हिंगवे व मयत नानी दानाजी हिंगवे, रा.एकलविहीर, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०३/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१८/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४८९/२०२६ ने.ता.२७/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) सुरयया नवशीन आरिफ पठाण, वय अं.४८ वर्ष, रा.वरुड, २) मोहम्मद सादीक मोहम्मद साबीर, वय अं.५१ वर्ष, रा.वरुड, ३) अंजुम रफिक शेख, वय अं.४३ वर्ष, रा.पुसला, ४) मोहम्मद सिराज मोहम्मद साबीर, वय अं.४७ वर्ष, रा.पुसला, ५) मोहम्मद रियाज मोहम्मद शाबीर शेख, वय अं.३८ वर्ष, रा.पुसला, ६) रुकैया बेगम मोहम्मद अब्दुल बासिद खान, वय अं.४० वर्ष, रा.वरंगल, ७) मोहम्मद रिजवान मोहम्मद शाबीर शेख, वय अं.३६ वर्ष, रा.पुसला, ८) अतिया बानो आसिफ खान, वय अं.३४ वर्ष, रा.नागपूर, ९) महम्मद ताहिर महम्मद शाबीर शेख, वय अं.३२ वर्ष, रा.पुसला, १०) अलिया अंजुम मोहम्मद जुबेर, वय अं.३० वर्ष, रा.जामाई, ता.जामाई, ११) अरशिया जबी मोहम्मद शाबीर शेख, वय अं.२८ वर्ष, रा.पुसला

**... विरुध्द ... गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत मोहम्मद शाबीर मोहम्मद नसीर व मयत नजिरा बी मोहम्मद शाबीर, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१८/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**





# निकाल आधीच गुलाल! वरुडमध्ये कार्यकर्त्यांचा उत्साह

## मतमोजणीपुर्वीच प्रविण पोटे पाटील यांच्या विजयाचे बॅनर



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – राजकारणात 'शेवटच्या क्षणापर्यंत काहीही होऊ शकतं' असं म्हटलं जातं, पण अमरावती विधान परिषद निवडणुकीत मात्र निकालाआधीच विजयाचा जल्लोष सुरु झाल्याचे चित्र वरुड शहरात पाहायला मिळत आहे. भाजपचे उमेदवार आणि माजी मंत्री प्रविण पोटे पाटील यांच्या विजयाची १०० टक्के खात्री असल्याचा दावा करत उत्साही कार्यकर्त्यांनी मतमोजणीपूर्वीच थेट 'विजयाचे बॅनर' झळकावले आहेत. शहरात लागलेले हे बॅनर सद्य: संपुर्ण जिल्ह्यात जोरदार चर्चेचा विषय ठरत आहेत.

**निकालाची वाट न पाहता शुभेच्छांचा वर्षाव**

अमरावती विधान परिषदेच्या जागेसाठी नुकतेच मतदान पार पडले असून अद्याप अधिकृत मतमोजणी झालेली नाही मात्र, प्रविण पोटे पाटील यांच्या गोटात आणि कार्यकर्त्यांमध्ये कमालीचा आत्मविश्वास पाहायला मिळत आहे. मतमोजणीच्या निकालाची साधी वाटही न पाहता, वरुडमधील मुख्य चौकात समर्थकांनी पोटे यांच्या अभिनंदनाचे आणि विजयाचे मोठे होर्डिंग्स लावुन दिले आहेत. 'भावी आमदार', 'विजयाबद्दल हार्दिक अभिनंदन' अशा आशयाचे हे बॅनर नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

**राजकीय वर्तुळात उलट–सुलट चर्चा**

निवडणुकीचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच अशा प्रकारे बॅनरबाजी करणे हा कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास आहे की विरोधकांवर दबाव टाकण्याची रणनीती? अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगु लागली आहे. नेत्यावरील निष्ठा आणि विजयाची खात्री म्हणुन कार्यकर्ते याकडे पाहत असले, तरी सर्वसामान्यांमध्ये मात्र या 'अॅडव्हान्स' विजयाची जोरदार चर्चा आहे.

**ट्विस्ट की अचुक अंदाज?**

कार्यकर्त्यांचा हा अंदाज अचुक ठरणार का? याकडे आता संपूर्ण अमरावती जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. अधिकृत निकालानंतरच या बॅनरबाजीचे खरे गुपित समोर येईल!




## शिवसेनेचे नेतृत्व उपरे ठरवणार नाहीत : उद्धव ठाकरे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – शिवसेनेचे नेतृत्व कोण करणार हे उपरे ठरवू शकत नाहीत. शिवसेना ही भूमिपुत्रांची आहे आणि शिवसैनिक ठरवतील तोच शिवसेना पक्षप्रमुख होईल. शिवसेनाप्रमुख दुसरा होणे नाही आणि हिंदुह्दयसम्राट तर अशक्यच आहे, अशा शब्दात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी रविवारी भाजप नेते अमित शहा यांना नाव न घेता सुनावले. अमित शहा यांनी शनिवारी कोल्हापूर येथील एका कार्यक्रमात बोलताना 'आता शिवसेना शिंदेंची झाली असून दुसरा कोणता गट राहिलेला नाही' असे वक्तव्य केले होते. या वक्तव्याचा उद्धव ठाकरे यांनी खास त्यांच्या शैलीत समाचार घेतला.

# जयंत पाटलांच्या राजकारणाला मोठा धक्का, सांगली साताऱ्यात भाजपची बाजी, धैर्यशील कदम मोठ्या फरकाने विजयी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**सांगली** – राज्याचं लक्ष लागलेल्या सांगली सातारा विधान परिषदेचा निकाल जाहीर झाला असून भाजपच्या धैर्यशील कदम यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा मोठा पराभव केला आहे. धैर्यशील कदम यांनी ५९३ मतं मिळवत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार अभयसिंह जगताप यांचा ३०१ मतांनी पराभव केला. अभयसिंह जगताप यांना २९२ मतं मिळाली आहेत. हा निकाल म्हणजे जयंत पाटील यांच्या राजकारणासाठी मोठा धक्का असल्याचं मानलं जात आहे.



विधान परिषद निकालाची आकडेवारी धैर्यशील कदम (भाजप) – ५९३, अभयसिंह जगताप – २९२ या निवडणुकीत एकूण ८९५ मतदारांपैकी ८९४ जणांनी मतदानाचा हक्क बजावला होता. या निवडणुकीत ९ मते अवैध ठरली. सांगली व सातारा जिल्ह्यातील १२ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडली होती. निकाल जाहीर होताच सांगली व सातारा जिल्ह्यात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा करायला सुरुवात केली आहे.

**पक्षीय बलाबल कसं होतं?**

भाजप – ३१४, राष्ट्रवादी – २०५, शिवसेना – १११, राष्ट्रवादी (शरद पवार) – ११९, काँग्रेस – ७३, शिवसेना (ठाकरे) ०१

महायुतीमध्ये योग्य समन्वय दरम्यान, सांगली आणि सातारामध्ये भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेमधील वाद लक्षात घेता महायुतीला या ठिकाणी अडचण निर्माण होणार अशी चर्चा होती. सातारा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेमध्ये मोठा वाद झाला होता. शिवसेना आणि राष्ट्रवादीकडे बहुमत असतानाही भाजपने त्यांची मतं फोडून आपला जिल्हा परिषद अध्यक्ष बसवला होता. त्यावेळी पोलिसांशी झालेल्या झटापटीत मंत्री शंभुराजे देसाई आणि मकरंद पाटील हे जखमी देखील झाले होते. त्यामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादी या ठिकाणी वेगळी भूमिका घेऊ शकते अशी चर्चा होती.

# वडिलांनी केला मुलावर कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

## फिर्यादीच्या तक्रारीवरुन वडिलांना अटक



**वरुड** – घरात कौटुंबिक वादातून वडिलांनी मोठ्या मुलावर कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी ६५ वर्षीय आरोपी वडिलांना अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी करण धुमकराव धुर्वे (३०) हा राजेंद्र होले यांचे शेतात राहणारे वडील धुमकराव अम्मीलाल धुर्वे (६५) यांना भेटण्यासाठी गेला होते. रात्री १० वाजताच्या सुमारास करण यांचा मोठा भाऊ अर्जुन धुर्वे हा दारु पिऊन तिथे आला व वडिलांना शिवीगाळ करुन त्यांचा मोबाईल फोडला. यावरुन त्यांच्यात भांडण सुरु झाले.

या भांडणा दरम्यान वडील धुमकराव धुर्वे यांनी घरातील कुऱ्हाड आणून मोठा मुलगा अर्जुन याच्या डोक्यावर मारली आणि त्याला गंभीर जखमी करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या घटनेबाबत करण धुर्वे यांनी दिलेल्या जबानी रिपोर्टवरुन पोलिसांनी कलम १०९, १ बी.एन.एस. २०२३ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपी वडील धुमणराव धुर्वे यांना २० जून २०२६ रोजी सकाळी ६:४२ वाजता अटक करण्यात आली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.





